ePaper

## दहशतवादी हल्ल्यात नौदल अधिकारी शहीद, 3 दिवसांपूर्वीच झाले होते लग्न

वर्ष - 8 । अंक - 264 | UDYAM-MH-26-0158827





# महाईन्यूज ™


### आतील पानांत


- दिल्लीचा दणदणीत विजय!
- मला बॅटिंगला का नाही पाठवलं?
- दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू
- गंभीर परिणाम भोगावे लागतील


www.mahaenews.com | बुधवार, दि. 23 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## मोदी यांच्याशी चर्चा करून अमित शहा श्रीनगरमध्ये


# ‘पाकव्याप्त काश्मीर’ वर ताबा ठोकण्याची तयारी!

## दहशतवाद्यांच्या अंदाधुंद गोळीबारात 27 जण ठार : मृतांमध्ये महाराष्ट्रातील पाच जण...

## पहेलगाममध्ये हिंदूंच्या मृतदेहांचा खच : हिंदू का? म्हणून विचारले आणि धाड धाड गोळ्या घातल्या!

। श्रीनगर / नवी दिल्ली / मुंबई । महाईन्यूज

पहलगामजवळ बैसरण खोऱ्यामध्ये पर्यटकांवर दहशतवाद्यांनी मंगळवारी दुपारी बेछूट गोळीबार केला. पर्यटकांमधील हिंदूंना बाजूला काढून दहशतवाद्यांनी त्यांना अचूक टिपले. या नरसंहारात किमान २७ पर्यटक ठार झाले असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध केला असून गृहमंत्री अमित शहा यांच्याशी ते सतत संपर्कात आहेत. रक्ताच्या प्रत्येक थेंबाचा बदला घेऊ, हिशेब चुकता करू, असे मोदी म्हणाले.




मोदींची तुम्ही माणसे, मोदींना डोक्यावर घेऊन बसला आहात, मोदींना धडा शिकवू..




दहशतवाद्यांचे ‘डेथ वॉरंट’ तयार!

पुण्यातील कर्वेनगरमधील पर्यटकही जखमी : पर्यटकांमधील पुरुष ‘टार्गेट’ : महिलांना फक्त धमकावले

### सीमेवर प्रचंड तणाव, भारताने कुमक वाढवली..

या पार्श्वभूमीवर पाकिस्तानातील दहशतवादी संघटना ‘लष्कर-ए- तोयबा’ ने ही जबाबदारी स्वीकारली आहे. आता पाकिस्तानला धडा शिकवण्याशिवाय पर्याय नाही, हीच भारताची भूमिका असून देशातील नागरिकांना विश्वासात घेण्यासाठी येत्या दोन दिवसात पाकिस्तानवर मोठी कारवाई होण्याची शक्यता आहे. कदाचित, भारताचे सुरक्षा दल हे पाकव्याप्त काश्मीरमध्ये घुसून तेथे ताबा ठोकण्याच्या तयारीत असल्याचे बोलले जाते.

### अमित शहा अ‍ॅक्शन मोड’ मध्ये

अमित शहा आणि लेफ्टनंट जनरल मनोज सिन्हा हे श्रीनगरला पोहोचले असून तेथून ते संपूर्ण ऑपरेशन हाताळत आहेत. दहशतवाद्यांना सोडणार नाही, असा इशारा सुरक्षा दलांनी दिला आहे.

### दुपारी अडीचच्या सुमारास भ्याड हल्ला..

काश्मीरमधील पहलगाम जिल्ह्यामध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांवर गोळीबार केल्याची घटना दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास घडली. या दहशतवादी हल्ल्यामध्ये एकूण २७ हून अधिक पर्यटकांचा मृत्यू झाला आहे.

### दहशतवादी पाकचे : मुख्य ‘टार्गेट’ नरेंद्र मोदी!

या दहशतवाद्यांच्या बोलण्याचा सूर हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात होता. त्यांच्या प्रत्येक वाक्यातून मोदीद्वेष स्पष्ट जाणवत होता. मोदींना तुम्ही भारतीयांनी डोक्यावर बसवून ठेवले आहे. त्यामुळे आम्हाला जास्त त्रास होतो आणि त्याचा बदला आम्ही घेणार आहोत, असे हे दहशतवादी बोलत होते.

### पाकवर कठोर कारवाई?

या भ्याड हल्ल्याची जबाबदारी पाकिस्तानने घेतली असल्यामुळे त्यांच्यावर लवकरात लवकर काहीतरी मोठी कारवाई होण्याची शक्यता आहे. विशेषतः, पाकव्याप्त काश्मीरमध्ये सुरू असलेली दहशतवादी केंद्रे उद्ध्वस्त करण्यासाठी तेथे लष्कर घुसवण्यात येण्याची शक्यता असून त्यानिमित्ताने त्या भूभागावर आता ताबा ठोकण्याचीही संधी असल्याचे काही विश्लेषकांनी आणि संरक्षणतज्ज्ञानीम्हटले आहे.

### नेते एकमेकांच्या संपर्कात

भारताच्या सुरक्षा दलाशी मोदी, शहा यांच्या व्यतिरिक्त संरक्षणमंत्री राजनाथ सिंग, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा दलाचे प्रमुख अजित डोवल हे संपर्कात असून त्यांची या हल्ल्यानंतर अनेक वेळा महत्त्वाची बोलणी देखील झाली आहेत. पुढील कारवाईबाबत आखणी देखील झाली आहे. काश्मीर खोऱ्यातील ३७० वे कलम हटवल्यानंतर झालेला हा सर्वात मोठा हल्ला आहे.

# अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त

## पुरेसा पाणीसाठा असतानाही पुरेसे पाणी न मिळण्यावरून संताप

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वाढत्या उन्हाळ्यामुळे गेल्या काही दिवसांपासून शहरातील विविध भागांत अपुऱ्या आणि कमी दाबाने पाणी येत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. एप्रिल महिन्यातच पाणी येत नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात असून, महानगरपालिकेचा पाणीपुरवठा विभाग मात्र याकडे गांभीर्याने पाहत नसल्याचा आरोप केला जात आहे.**



जलवाहिनीमधून होत असलेली पाणीगळती थांबविण्यासाठी दुरुस्तीची कामे महापालिकेकडून केली जात असल्याने अशा कामांवेळी संबंधित भागांतील पाणीपुरवठा बंद ठेवला जात असल्याने नागरिकांना पाण्यापासून वंचित राहावे लागत आहे.कात्रज, भारती विद्यापीठ, कोंढवा यासह सहकारनगर, पर्वती या भागांत गेल्या काही दिवसांपासून पाणीपुरवठा विस्कळीत होण्याचे प्रमाण वाढले आहे.महापालिकेच्या वडगाव बुद्रुक जलशुद्धीकरण केंद्रातून सिंहगड रस्ता, कात्रज, कोंढवा या परिसराला पाणीपुरवठा केला जातो. गेले महिना ते दीड महिन्यापासून कात्रज गावठाण, सुखसागरनगर, कोंढवा, राजस सोसायटी या परिसरात आठवड्यातील एक दिवस पाणीपुरवठा बंद राहत आहे. गेल्या सहा आठवड्यांपासून दर मंगळवारी या भागातील पाणीपुरवठा बंद राहत असल्याने येथील नागरिक त्रस्त झाले आहेत. धरणात पुरेसे पाणी शिल्लक असताना महापालिकेकडून मात्र पाणीपुरवठा करण्यास अडचणी का येत आहेत, असा प्रश्न नागरिकांकडून विचारला जात आहे.

गेल्या आठवड्यात कात्रज परिसरातील आगम मंदिर येथे मुख्य जलवाहिनीतून होणारी पाणीगळती थांबविण्यासाठी पाणीपुरवठा विभागाने १७ एप्रिलला काम हाती घेतले होते. त्यामुळे भारती विद्यापीठ, सावंत विहार, वंडर सिटी, कदम प्लाझा, आंबेगाव बुद्रुक, जांभूळवाडी रोड, तसेच आजूबाजूच्या परिसरातील पाणीपुरवठा बंद ठेवण्यात आला होता.आंबेगाव पठार येथील प्रभाग क्रमांक १६ मध्ये महापालिकेचे पाणी येत नसल्याने महिला वर्गामध्ये प्रचंड रोष आहे. या भागातील महिलांनी गेल्या आठवड्यात महापालिकेवर हंडा मोर्चा काढला. महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांना निवेदन देऊन या भागातील महिलांनी पाणीपुरवठ्याच्या तक्रारींचा पाढा वाचला. त्याची दखल घेऊन आयुक्त भोसले यांनी येथील पाणीपुरवठा सुरळीत करण्याच्या सूचना पाणीपुरवठा विभागाला दिल्या होत्या. मात्र, यामध्ये अद्यापही फारशी सुधारणा झाली नसल्याची तक्रार केली जात आहे. प्रभाग क्रमांक ३१ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात जीएसआर टाकीची मुख्य वाहिनी समान पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू असताना गळती झाली.

### पाणीपुरवठा बंद ठेवला जाणार

नवचैतन्य सोसायटी, आनंद कॉलनी, इंगळेनगर आदी भागांत पाणी आले नाही.सिंहगड रस्त्यावरील धायरी परिसरातील पाणीपुरवठा उद्या (गुरुवारी) २४ एप्रिलला बंद ठेवला जाणार आहे. जुनी धायरी येथे मुख्य दाब जलवाहिनीमधून पाण्याची गळती होत आहे. ही गळती थांबविणे, तसेच या परिसरात असलेल्या पारे कंपनी रस्ता येथे स्थापत्यविषयक तातडीचे देखभाल-दुरुस्तीचे काम करण्यासाठी पाणीपुरवठा बंद ठेवला जाणार आहे. गणेशनगर, लिमयेनगर, गारमळा, गोसावी वस्ती, बरांगणी मळा, दळवीवाडी, कांबळेवस्ती, मानस परिसर, नाईक आळी, यशवंत विहार आणि आजूबाजूच्या परिसरातील पाणी बंद राहणार आहे.

# पुण्याचा अर्चित डोंगरे 'यूपीएससी'त तिसरा

## अंतिम निकाल जाहीर, राज्यातील 50 हून अधिक उमेदवार यशस्वी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे (यूपीएससी) नागरी सेवा परीक्षा २०२४चा अंतिम निकाल जाहीर करण्यात आला. त्यात राज्यातील अर्चित डोंगरे या उमेदवाराने देशात तिसरा आणि राज्यात पहिला क्रमांक पटकाविला असून, राज्यातील ५०हून अधिक उमेदवार या परीक्षेत यशस्वी ठरले आहेत. यूपीएससीने प्रसिद्धिपत्रकाद्वारे निकाल जाहीर केला. त्यात शक्ती दुबे देशात पहिला, तर हर्षिता गोयलने द्वितीय क्रमांक पटकाविला. यूपीएससीतर्फे नागरी सेवा परीक्षा २०२४मधील लेखी परीक्षा सप्टेंबर २०२४मध्ये, तर मुलाखती जानेवारी ते एप्रिल २०२५ या कालावधीत घेण्यात आल्या.**




त्यानंतर शिफारसपात्र उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली.नागरी सेवा परीक्षा प्रक्रिया एकूण १ हजार १२९ पदांसाठी राबविण्यात आली. त्यात भारतीय प्रशासकीय सेवेच्या (आयएएस) १८०, भारतीय परराष्ट्र सेवेच्या (आयएफएस) ५५, भारतीय पोलीस सेवेच्या (आयपीएस) १४७, केंद्रीय सेवा 'गट अ'च्या ६०५, तर 'गट ब'च्या १४२ जागांचा समावेश आहे. त्यातील ५० जागा दिव्यांग उमेदवारांसाठी राखीव असल्याची माहिती देण्यात आली आहे. जाहीर केलेल्या निकालातील २४१ उमेदवारांची शिफारस तात्पुरती असून, एका उमेदवाराचा निकाल राखीव ठेवण्यात आल्याचे यूपीएससीने नमूद केले आहे. शिफारसपात्र १००९ उमेदवारांमध्ये ७२५ पुरुष, तर २८४ महिला उमेदवारांचा समावेश आहे. निकालामध्ये पहिल्या शंभर उमेदवारांमध्ये राज्यातील काही उमेदवारांनी जागा मिळवली आहे. त्यात शिवांश जागडे (२६वा), आदिती चौघुले (६३वा), साईचैतन्य जाधव (६८वा), विवेक शिंदे (९३वा), तेजस्वी देशपांडे (९९वा) आदींनी यश मिळवले आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे (यूपीएससी) नागरी सेवा परीक्षा २०२४चा अंतिम निकाल जाहीर करण्यात आला. त्यात राज्यातील अर्चित डोंगरे या उमेदवाराने देशात तिसरा आणि राज्यात पहिला क्रमांक पटकाविला असून, राज्यातील ५०हून अधिक उमेदवार या परीक्षेत यशस्वी ठरले आहेत. यूपीएससीने प्रसिद्धिपत्रकाद्वारे निकाल जाहीर केला. त्यात शक्ती दुबे देशात पहिला, तर हर्षिता गोयलने द्वितीय क्रमांक पटकाविला. यूपीएससीतर्फे नागरी सेवा परीक्षा २०२४मधील लेखी परीक्षा सप्टेंबर २०२४मध्ये, तर मुलाखती जानेवारी ते एप्रिल २०२५ या कालावधीत घेण्यात आल्या.

त्यानंतर शिफारसपात्र उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली.नागरी सेवा परीक्षा प्रक्रिया एकूण १ हजार १२९ पदांसाठी राबविण्यात आली. त्यात भारतीय प्रशासकीय सेवेच्या (आयएएस) १८०, भारतीय परराष्ट्र सेवेच्या (आयएफएस) ५५, भारतीय पोलीस सेवेच्या (आयपीएस) १४७, केंद्रीय सेवा 'गट अ'च्या ६०५, तर 'गट ब'च्या १४२ जागांचा समावेश आहे. त्यातील ५० जागा दिव्यांग उमेदवारांसाठी राखीव असल्याची माहिती देण्यात आली आहे. जाहीर केलेल्या निकालातील २४१ उमेदवारांची शिफारस तात्पुरती असून, एका उमेदवाराचा निकाल राखीव ठेवण्यात आल्याचे यूपीएससीने नमूद केले आहे.

### 50 जागा दिव्यांग उमेदवारांसाठी

शिफारसपात्र १००९ उमेदवारांमध्ये ७२५ पुरुष, तर २८४ महिला उमेदवारांचा समावेश आहे. निकालामध्ये पहिल्या शंभर उमेदवारांमध्ये राज्यातील काही उमेदवारांनी जागा मिळवली आहे. त्यात शिवांश जागडे (२६वा), आदिती चौघुले (६३वा), साईचैतन्य जाधव (६८वा), विवेक शिंदे (९३वा), तेजस्वी देशपांडे (९९वा) आदींनी यश मिळवले आहे.

## पिंपरी-चिंचवडमधील विविध रस्त्यांच्या भूसंपादनाच्या कामाला गती द्या!

# “मिसिंग लिंक” साठी लवकरच ‘ॲक्शन प्लॅन’!

## आमदार महेश लांडगे यांची जिल्हाधिकाऱ्यांना मागणी

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरासह समाविष्ट गावांमध्ये विकास आराखड्यातील रस्त्यांना भूसंपादनाचा मोठा अडथळा आहे. त्यामुळे तब्बल 42 ठिकाणी “मिसिंग लिंक” आहेत. संबंधित रस्त्यांचे काम पूर्ण करण्यासाठी ‘कृती आराखडा’ तयार करावा, अशी मागणी भाजपा नेते आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**






याबाबत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांना पत्र दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहराचा झपाट्याने विकास होत आहे. ‘मेट्रो सिटी’ अशी ओळख असलेल्या या शहरामध्ये 2014 नंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका हद्दीतील पिंपरी-चिंचवडसह समाविष्ट गावांच्या विकासाला चालना देण्यात आली. परिणामी, गेल्या १० वर्षांमध्ये शहर आणि उपनगरांमध्ये नागरीकरण आणि गृहप्रकल्प मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. यामुळे वाहतूक कोंडी आणि ताण मोठ्या प्रमाणात वाढला आहे. महापालिका हद्दीतील एकूण 42 “मिसिंग लिंक” आहेत. त्याचे काम पूर्ण झाल्यास शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार आहे. वाढत्या शहरीकरणाला पोषक पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करता येणार आहेत, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

> “जिल्हाधिकारी प्रशासनाने भूसंपादनाचे काम पूर्ण करुन संबंधित जागा महापालिका प्रशासनाकडे हस्तांतरीत केली. तर आगामी काळात महापालिका प्रशासनाला संबंधित 42 रस्त्यांचे काम पूर्ण करता येणार आहे. त्यामुळे वाहतूक समस्या सोडवण्यासाठी मदत होईल, अशी अपेक्षा आहे. या अनुशंगाने, पिंपरी-चिंचवड शहरातील “मिसिंग लिंक” चे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत कृती आराखडा तयार करावा, या करिता आम्ही पाठपुरावा करीत आहोत. शहरातील वाहतूक सक्षमीकरासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहोत.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

### महापालिकेचे ‘मिसिंग लिंक’च्या कामाला प्राधान्य...

शहरातील विविध भागांमध्ये सकाळच्या आणि संध्याकाळच्या वेळी वाहतूक कोंडी पाहायला मिळते. वेगाने वाढणारी लोकसंख्या आणि वाहनांची संख्या यामुळे रस्ते आणि पूल अपुरे पडत आहेत. ज्यामुळे रहदारीची कोंडी वाढली आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने वाढत्या वाहतूक समस्येचे निराकरण करण्यासाठी एक व्यापक कृती आराखडा हाती घेतला आहे. त्याद्वारे मिसिंग लिंकचे काम प्राधान्याचे पूर्ण करण्याबाबत पाठपुरावा केला जात आहे. मात्र, भूसंपादनाअभावी मिसिंग लिंकचे काम पूर्ण करण्यास अडथळे येत आहेत.

---


## पिंपरी पालिकेचे संकेतस्थळ झाले नवे!

### आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते पालिकेच्या नव्या संकेतस्थळाचे लोकार्पण

### स्मार्ट शहरासाठी आधुनिक संकेतस्थळाची लोकाभिमुख सुरुवात

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिकांना डिजिटल माध्यमातून अधिक पारदर्शक, सक्षम व गतिमान सेवा पुरवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. या पार्श्वभूमीवर, नव्याने विकसित करण्यात आलेल्या महापालिकेच्या संकेतस्थळाचे लोकार्पण आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आले. हे संकेतस्थळ आता सर्व नागरिकांसाठी अधिकृतपणे खुले करण्यात आले आहे.**





Pcmc.gov.in या संकेतस्थळामध्ये दिव्यांग नागरिकांसाठी सुलभ असलेले संकेतस्थळ, डब्ल्यूसीएजी च्या डबल-ए (Aमानांकनासह सुसज्ज आहे. एआय टेक्नॉलॉजी वर आधारित चॅट जीपीटीचा वापर करून माहिती अधिक सुलभपणे उपलब्ध होणार असून नागरिकांचे प्रश्न अधिक वेगात आणि अचूकतेने हाताळण्यासाठी यामुळे मदत होणार आहे. हॅकथॉन २०२५ अंतर्गत मिळालेल्या देशभरातील १७५ तज्ज्ञ सहभागींच्या अभिप्रायानुसार संकेतस्थळात सुधारणा करण्यात आल्या असून एथिकल हॅकर्समार्फत सखोल सुरक्षा तपासणी करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार संकेतस्थळाचे डिझाईन करण्यात आले आहे. करसंकलन, देयके भरणे, तक्रारी नोंदवणे यांसारख्या सेवा आता एका क्लिकवर उपलब्ध होणार आहेत. या प्रकल्पासाठी महापालिकेचे मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण आणि श्रीमती उज्वला गोडसे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

> “महापालिकेचे नवे संकेतस्थळ हे नागरिक केंद्रित दृष्टिकोनातून तयार करण्यात आले असून, त्याचा उद्देश शहरवासीयांना डिजिटल माध्यमातून जलद, पारदर्शक आणि सुरक्षित सेवा देणे हा आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, ॲक्सेसिबिलिटी स्टँडर्ड्स आणि सुरक्षेच्या आधुनिक निकषांचा समावेश करून हे संकेतस्थळ अधिक सुलभ आणि विश्वासार्ह बनविण्यात आले आहे.
>
> **-शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक

> “पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नव्या संकेतस्थळाचा विकास करताना केवळ तांत्रिक बाबींवर लक्ष केंद्रीत न करता, नागरिकांचा अनुभव केंद्रस्थानी ठेवण्यात आला आहे. हे संकेतस्थळ केवळ माहिती पुरवणारे माध्यम नसून, महापालिकेच्या विविध सेवा एका ठिकाणी उपलब्ध करून देणारा प्रभावी डिजिटल प्लॅटफॉर्म आहे.
>
> **- निळकंठ पोमण,** मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### सत्समागम हा सर्व साधनांचा राजा !

मनुष्यजन्माला येणे, संतांची भेट होणे आणि त्यांना ओळखून त्यांचा सहवास होणे या तिन्ही गोष्टी फार दुर्घट आहेत. म्हणूनच संतसमागमासारखा लाभ नाही असे म्हणतात. सत्समागम म्हणजे सर्व साधनांचा राजा होय. काही मागण्याची इच्छाच संत नष्ट करतात, मग मिळवायचे कुठे राहते ? संत बनणे व्यावहारिकदृष्ट्या काही सुखाचे नसते. एखाद्या स्नानसंध्याशील आणि सदाचरणी माणसाच्या अंगावर तेज दिसते, कारण देहाला धरून झालेल्या कर्मांचे ते तेज असते; पण एखाद्या सत्पुरुषाच्या देहावर बाहेर तसे तेज दिसणारही नाही. आत वावरणाऱ्या भगवंताच्या ज्ञानाला योग्य असा सत्पुरुषाचा देह असतो. देहाच्या आधाराने भोगण्याची या जगामधली जी सुखे आहेत, त्यांचे मार्ग सत्पुरुषापेक्षा आपण प्रापंचिक लोक जास्त जाणतो. परंतु देहाच्या पलीकडे असणारे आणि कायमचे टिकणारे, आणि देहाला विसरून आणि देवाला स्मरून जे मिळवायचे, असे भगवंताचे सुख आहे. ते प्राप्त होण्याचा मार्ग समजावून घेण्यासाठी आपण सत्पुरुषाकडे गेले पाहिजे. विषयतृप्तीसाठी जावे आणि निर्विषय होऊन यावे, हा संतसंगतीचा परिणाम. असा जो असेल तोच संत, नव्हे, प्रत्यक्ष भगवंत होय. अशांची संगती केव्हा होईल ही तळमळ असावी. संत आपल्याला सत्यस्वरूपाची ओळख करून देतात. सत्पुरुषाने आखून दिलेल्या मार्गाने कायावाचामनाने जे कर्म केले जाते ते पौरुषच होय. आगगाडीत बसणारी सर्व माणसे, मग ती कोणत्याही क्लासमध्ये बसणारी असोत, इतकेच नव्हे तर बिनतिकिटाची माणसेदेखील, गाडीबरोबर सरळ म्हणजे शेवटच्या स्टेशनापर्यंत जाऊन पोहोचतात; त्याचप्रमाणे संतांची संगत करणारी सर्व माणसे भगवंतापर्यंत पोहोचतात. त्यांच्यामधली बिनतिकिटाची, म्हणजे दुष्ट, पापी, दुराचारी, त्याज्य आणि अयोग्य अशी माणसेसुद्धा तरून जातात; मात्र कोणीही गाडी तेवढी सोडता कामा नये. हाच सत्संगतीचा महिमा. परमार्थ साधण्यासाठी सत्संगती फार उपयोगी पडते. ही संगती तीन प्रकारची असते : एक, संताचा प्रत्यक्ष देहामध्ये सहवास; दोन, संताने सांगितलेल्या मंत्राचा सहवास; आणि तीन, संताच्या विचारांची संगत. संगतीचा परिणाम नकळत होतो, म्हणून सत्संगती धरावी. आपण ज्याकरिता जन्माला आलो ते कारण फक्त संतच उमगले; म्हणून त्यांना शरण जावे. संत स्वतः समाधान मिळवून ते दुसऱ्याला देतात, हे त्यांचे आपल्यावर केवढे उपकार आहेत !

**बोधवचन:- संतांजवळ जे समाधान असते ते आपल्याला लाभले, म्हणजे संताची प्रचीती आली असे समजावे.**



## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# यशाच्या उत्तुंग शिखरावरून, थेट आत्महत्येच्या खोल गर्तेत!

**एका मनस्वी आणि चिंताजनक विषयाला आज हात घालू या.. प्रत्येक जण आपल्या जीवनात धडपडत असतो, पैशासाठी, प्रतिष्ठेसाठी, सुखासाठी.. समाधानासाठी ! आणि या सर्व गोष्टी पायाशी लोळण घेत असताना अशा व्यक्तींना अचानक आत्महत्या का करावीशी वाटते? याचे उत्तर मात्र सापडत नाही !**



### मन सुन्न करणारी यादी..

प्रचंड निराशा, विचार करण्याच्या क्षमतेचा अंत झाला की असे काहीतरी सुचत असावे.. मग कितीही मोठी व्यक्ती असो, ती यशाच्या उत्तुंग शिखरावरून थेट आत्महत्येच्या खोल गर्तेत पोहचते आणि समाजापुढे मोठे प्रश्नचिन्ह उभे राहते ! बरं, आत्महत्या कोणी करावी, का करावी? यालाही काही सीमा नाही..सहज आठवली, म्हणून मोठमोठी नावे पुढे आली.. आणि पुन्हा मन विचारांच्या पलीकडे जाऊन पोहोचले, अक्षरशः सुन्न झाले!

### प्रचंड मोठे कर्तृत्व आणि आत्महत्या..

सोलापूरमध्ये दोन दिवसांपूर्वी अतिशय नावाजलेले, प्रतीथयश डॉ. शिरीष वळसंगकर यांनी डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केली. सोलापुरातील अत्यंत लोकप्रिय, हजारो रुग्णांना रोगमुक्त आणि वेदनामुक्त करणारे डॉ. वळसंगकर यांचे जाणे मनाला फारच वेदना देऊन गेले आणि मन थोडेसे इतिहासात भरकटू लागले ! किती थोर मंडळींनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवून शेवटी आत्महत्येचा मार्ग पत्करला, हे पाहिले तर हे टोकाचे पाऊल उचलण्याएवढे काय झाले असावे, याचा विचार मनात येतो.

### हिटलर, सानेगुरुजी, गुरुदत्त..

संकटाशी सामना करण्याची मानसिकता नसणारे भित्रे, भेकड, कमकुवत मनाचे लोक आत्महत्येचा मार्ग अवलंबत असावेत, असे संदर्भ अनेक पुस्तकांमध्ये मिळतात.. पण, अशा पद्धतीने जीवन संपवणाऱ्यांमध्ये अवघ्या जगाला हादरवणारा ॲडॉल्फ हिटलर, समतेची आणि मानवधर्माची ज्योत तेवत ठेवणारे सानेगुरुजी, एकापेक्षा एक सरस चित्रपट निर्मिती करणारे गुरुदत्त यांच्यासारख्यांचा समावेश असावा, ही बाब फारच चिंतनीय म्हणावी लागेल !

### खरा तो एकची धर्म..

जगावर अधिराज्य गाजवणाऱ्या आणि आज सुद्धा एखाद्या कडक व्यक्तीचा उल्लेख ज्याच्या नावे केला जातो त्या लाखो जीव घेणाऱ्या क्रूर हिटलरने शेवटी आत्महत्या केली ! समाजाला सुंदर विचार देणारे आणि सुंदर सुंदर लिखाण आणि काव्य करून समाज सुधारणेसाठी झटणारे सानेगुरुजी आत्मघात करुन घेतात. 'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे!' असे म्हणत स्वतःला संपवून घेतात!

### मनाला खंबीर करण्याचे शिक्षण..

'मनशक्ती' नावाचे मनाला खंबीर करण्याचे शिक्षण देणारे लोणावळ्याचे स्वामी विज्ञानानंद मंत्रालयावरुन उडी मारुन जीव देतात, ही धक्कादायक घटना नव्हे काय? अध्यात्मिक गुरु अशी ओळख निर्माण केलेले, लाखो शिष्यांचा लवाजमा भोवती असणारे आणि कित्येकांना आधार देणारे भैय्युजी महाराज आपले जीवन आपल्याच हाताने संपवतात आणि जीवनात सांभाळलेला लाखो जणांचा गोतावळा बेवारस सोडून निघून जातात, याचे आश्चर्य वाटते.

### चित्रपट सृष्टीतील 'गुरू'..

मुंबईत येऊन चित्रपटातील अभिनय, निर्मिती आणि दिग्दर्शन याचा एक आदर्श घालून देणारे गुरुदत्त हे अशाच पद्धतीने सर्व काही आलबेल वाटत असताना, आत्महत्या करून जगाचा निरोप घेतात आणि आपल्या चाहत्यांना दुःखाच्या खाईत लोटतात, हे अनाकलनीय वाटते ! पॉझिटिव्ह विचार देणारा चित्रपट करुनही सुशांतसिंग राजपूतने नैराश्यातून आत्महत्या केली, असे म्हटले जाते पण खरे कारण अजून समजलेले नाही !

### नैराश्याबरोबर दोन हात करत..

काही महिन्यांपूर्वी नैराश्याशी लढा कसा द्यायचा, याचे धडे जनतेला देणाऱ्या, त्याची शिकवण आणि आनंदाची उधळण करणाऱ्या एका तेजस्वी घराण्यातील शीतल (आमटे) करजगी आपले जीवन असेच अचानक संपवतात आणि पुन्हा आनंदा पुढे मोठे प्रश्नचिन्ह उभे करतात !

### डोके सुन्न करणारी बातमी..

नागपूरची बातमी वाचून तर डोके सुन्नच झाले. उच्च विद्याविभूषित, दिवंगत कुलगुरुंच्या पत्नी तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ज्योत्स्ना मेश्राम यांनी नवव्या मजल्यावरून उडी घेऊन नैराश्यातून आत्महत्या केली. कदाचित कारण काहीतरी वेगळे असेल, पण आत्महत्या करण्याचे सुचले कसे ? याचा विचार करताना डोके चालत नाही, हे नक्की!

### एक ना दोन.. शेकडो उदाहरणे !

अशी एक ना दोन शेकडो उदाहरणे आपण रोज समाजात पाहतो. मोठे नाव असेल तर वृत्तपत्रांमध्ये बातमी येते, खेडोपाडी अनेक जीव असेच गेलेले असतात, ज्यांचा मागमूसही लागत नाही. परीक्षेत कमी मार्क पडतील या भीतीने, कमी मार्क पडले..आता आई-बाबा काय म्हणतील? या अपेक्षेने अनेक जण मृत्यूला कवटाळतात..मानसिक, शारीरिक छळ, कुटुंबाची चिंता, वाढलेले कर्ज, शुल्लक कारणावरून होणारे वाद..अशा अनेक घटना आत्महत्येला कारणीभूत असाव्यात !

### समाजाने काय शिकायचे?

जगातील थोरामोठ्यांची अशी दुर्दैवी उदाहरणे पाहून सर्वसामान्यांनी त्यातून काय शिकायचे? हा खरा प्रश्न आहे. पाण्यात शांतपणे पोहणारे बदक वरुन शांत दिसत असले तरी पाण्याखाली त्याचे पाय वेगाने हलत असतात. शांत पोहतोय, हे दाखवण्यासाठी करावे लागणारे त्याचे कष्ट फक्त त्यालाच माहीत असतात. माणूस वर वर दिसतो तितका आतून खंबीर असेलच असे नाही..त्याच्या मनात वेगळीच खळबळ असू शकते..मनात वेगळीच विचारचक्रे फिरत असू शकतात, जी आपल्यापर्यंत पोहचत नाहीत किंवा तो त्या आनंदी आणि सुखी चेहऱ्याच्या आड आपली दुःखे किंवा चिंता लपवत असतो, लपवण्याचा प्रयत्न करत असतो!

शेवटी काय? वर सुंदर दिसणारा ताजमहाल असला तरी खाली कबरच आहे, हे विसरुन चालणार नाही. भैय्यूजी महाराजांनी आत्महत्या केल्यानंतर एका चॅनलने एक परिचर्चा घडवून आणली होती. त्यात बोलताना भैय्यूजी महाराजांच्या अगदी जवळच्या मित्राने मानवी स्वभावाचा फार चांगला पैलू सांगितल्याचे आठवते. भैय्यूजी महाराज स्वतः एक अध्यात्मिक गुरू होते, परंतु ते एक व्यक्ती पण होते. आपल्या मनातील 'स्ट्रेस' म्हणजेच तणाव बाहेर काढायला, मनमोकळेपणाने बोलायला त्यांच्याजवळ अगदी आपलीशी जवळ वाटणारी व्यक्ती किंवा सानिध्य ( थोडक्यात आऊटलेट ) नव्हते ! हीच गोष्ट बाबा आमटे यांची नात डॉ. शीतल आमटे यांच्या बाबतीतही सांगता येईल.

### व्यक्त व्हा..महत्वाचे आहे ते !

कोट्यवधी रूपये खर्च करून पाण्यासाठी विशाल धरण बांधले आणि समजा त्याला बाहेर पडण्याचा मार्ग (आऊटलेट) च दिला नाही, तर काय होईल ? निश्चितच धरण फुटेल. इतके महत्वाचे असते, हे मनसोक्तपणे व्यक्त होणे! आपले मानवी शरीर म्हणजे विविध पंचतत्वापासून सांधलेले एक धरणच आहे. या शरीरात समस्यांची आवक मोठ्या प्रमाणात झाली, तर हे शरीररूपी धरण फुटेल का तंदुरुस्त राहील ? मुंबई दरवर्षी का तुंबते ? पुरेसे 'आउटलेट्स' नाहीत म्हणूनच ना !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# बदला घेतल्याशिवाय राहणार नाही!

## जम्मू-काश्मीरमधील दहशतवादी हल्ल्यानंतर शिंदेंची संतप्त प्रतिक्रिया

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**जम्मू आणि काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाम येथे आज दुपारी अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ लोकांचा मृत्यू झाला आहे. या हल्ल्यात अनेक पर्यटक जखमी देखील झाले असून मृतांमध्ये महाराष्ट्रातील दोन नागरिकांचा समावेश आहे. मिळालेल्या माहितीनुसार दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास पहलगाम येथील बैसरन पर्वत रांगेच्या खोऱ्यात दहशतवाद्यांनी पर्यटकांवर बेछूट गोळीबार केला. अनेक पर्यटकांना धर्म विचारून त्यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान या हल्ल्यानंतर राजकीय वर्तुळातून याचा निषेध केला जात आहे. यादरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली असून या हल्ल्याच बदला घेतला जाईल असे शिंदे म्हणाले आहेत.**



"अतिशय दुर्दैवी घटना घडली आहे. या दहशतवादी हल्ल्याचा मी निषेध करतो आणि धिक्कार करतो. खरंतर पर्यटकांवर झालेला हा पहिलाच मोठा भ्याड हल्ला आहे. पोलिसांच्या वेषात येऊन नावं विचारून समोरून गोळ्या घातल्या आहेत. या पाकड्यांचा आणि दहशतवाद्यांचा जेवढा निषेध करता येईल तो थोडाच आहे. काश्मीर हे नंदनवन आहे. येथे पर्यटक पर्यटनसाठी जातात. अशा प्रकारचा भ्याड हल्ला करून दहशतवाद्यांनी जे नीच कृत्य केले आहे त्याचा मी पुन्हा एकदा निषेध करतो."मोदींनी देखील निषेध केला आहे आणि त्यांनी स्वत: देशाचे कणखर गृहमंत्री अमित शाह यांना काश्मीरमध्ये पाठवलं आहे. आता ते काश्मीरमध्ये पोहचतील. मला विश्वास आहे की ॲक्शनला रिॲक्शन होईल. या भ्याड हल्ल्याचा बदला आपले सैनिक नक्की घेतील. देशाचे पंतप्रधान आणि गृहमंत्री याचा बदला घेतल्याशिवाय राहाणार नाहीत आणि याला करारा जवाब दिल्याशिवाय राहाणार नाहीत," असे एकनाथ शिंदे म्हणाले आहेत. गेल्या अनेक वर्षात हे सगळे पाकडे बिळात लपले होते. मोदींचे सरकार आल्यानंतर यांची असा हल्ला चढवण्याची हिम्मत नव्हती. पण जाणीवपूर्वक हे कृत्य झालं आहे. यामध्ये निरपराध देशातील पर्यटक मारले गेलेत किंवा जखमी झालेत. या भ्याड हल्ल्याचा बदला नक्की घेतल्याशिवाय पंतप्रधान आणि गृहमंत्री राहाणार नाहीत, असेही एकनाथ शिंदे म्हणाले.या दहशतवादी हल्ल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. "पहलगाममध्ये झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्ल्याचा मी तीव्र शब्दात निषेध करतो. या घटनेत जे लोक मृत्यूमुखी पडले, त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली. त्यांच्या कुटुंबीयांच्या, आप्तस्वकियांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. या घटनेत जे जखमी झाले, त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. जम्मू-काश्मीर प्रशासनातील वरिष्ठांच्या आम्ही संपर्कात आहोत. पहलगाम ज्यांच्या अखत्यारीत येते, ते काश्मीरचे विभागीय आयुक्त विजयकुमार बिदरी यांनाही फोन करुन माहिती घेतली. आतापर्यंत प्राप्त माहितीनुसार, महाराष्ट्रातील दोन पर्यटकाचा मृत्यू झाला असून, त्यात दिलीप डिसले, अतुल मोने असे दोघे आहेत. स्थानिक प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, या दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रातील 2 जण जखमी झाले आहेत. त्यातील एक माणिक पटेल हे पनवेलचे आहेत. एस. भालचंद्रराव हे दुसरे जखमी आहेत. सुदैवाने दोघांचीही प्रकृती स्थिर आहे," असे फडणवीस म्हणालेत.काश्मीरमधील पहलगाम भागात पर्यटकांवर झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा मी तीव्र शब्दांत निषेध करतो. या दुर्दैवी घटनेत काही पर्यटकांचा मृत्यू तर, काही जण गंभीर जखमी झाल्याचं वृत्त अतिशय धक्कादायक आणि मन हेलावून टाकणारं आहे. या दुर्घटनेत मृत्यू पावलेल्यांना मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांप्रती सहसंवेदना व्यक्त करतो.

### अजित पवारांकडून तीव्र निषेध

जखमींच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा होवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना करतो. मोदींचे सरकार आल्यानंतर यांची असा हल्ला चढवण्याची हिम्मत नव्हती. पण जाणीवपूर्वक हे कृत्य झालं आहे. यामध्ये निरपराध देशातील पर्यटक मारले गेलेत किंवा जखमी झालेत. या भ्याड हल्ल्याचा बदला नक्की घेतल्याशिवाय पंतप्रधान आणि गृहमंत्री राहाणार नाहीत, असेही एकनाथ शिंदे म्हणाले. या दहशतवादी हल्ल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. "पहलगाममध्ये झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्ल्याचा मी तीव्र शब्दात निषेध करतो. या घटनेत जे लोक मृत्यूमुखी पडले, त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# हिंदी भाषेची सक्ती नाही : शिक्षण मंत्री दादा भुसे

## सरकारचे एक पाऊल मागे, लवकरच नवीन शासन निर्णय

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**महाराष्ट्र सरकारने काही दिवसांपूर्वी शासन निर्णय काढून त्रिभाषा सूत्रानुसार पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य केली होती. या निर्णयानंतर महाराष्ट्रातील राजकारण ढवळून निघाले. या निर्णयाला सर्व स्तरातून तीव्र विरोध झाल्यानंतर आता राज्य सरकारने एक पाऊल मागे घेतले आहे. यापुढे राज्य मंडळाच्या मराठी आणि इंग्रजी शाळांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंत हिंदी भाषा अनिवार्य नसणार आहे, अशी घोषणा शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी केली आहे.**



शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी पत्रकार परिषद घेऊन याची ग्वाही दिली. लवकरच सुधारित शासन निर्णय काढून त्यातील हिंदी भाषेबद्दलचा "अनिवार्य" हा शब्द काढला जाईल, असे ते म्हणाले. त्रिभाषा सूत्र कायम राहिल, जर इतर भाषेची मागणी बहुसंख्य विद्यार्थ्यांनी केली तर शाळेने त्यापद्धतीने भाषेचा पर्याय उपलब्ध करून द्यावा, असेही मंत्री भुसे यांनी सांगितले.राज्याच्या भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी या धोरणावर टीका केल्यानंतर सदर निर्णय मागे घेतला असल्याचेही दादा भुसे यांनी सांगितले. दि. १६ एप्रिल रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार 'राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडा २०२४'नुसार, मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांतील पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना मराठी आणि इंग्रजीसह हिंदी ही तृतीय भाषा म्हणून शिकावी लागणार होती.राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) पायाभूत स्तरासाठीचा आणि शालेय स्तरासाठीचा, असे राज्य अभ्यासक्रम आराखडे तयार केले आहेत. शालेय शिक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील सुकाणू समितीने या दोन्ही आराखड्यांना मान्यता दिली आहे. त्यानंतर आता शालेय शिक्षणात राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणी संदर्भातील शासन निर्णय शालेय शिक्षण विभागाने प्रसिद्ध केला आहे. सुकाणू समितीने मान्यता दिलेल्या आराखड्यातच हिंदी सक्तीने शिकवण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले होते. शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी पत्रकार परिषद घेऊन याची ग्वाही दिली. लवकरच सुधारित शासन निर्णय काढून त्यातील हिंदी भाषेबद्दलचा "अनिवार्य" हा शब्द काढला जाईल, असे ते म्हणाले. त्रिभाषा सूत्र कायम राहिल, जर इतर भाषेची मागणी बहुसंख्य विद्यार्थ्यांनी केली तर शाळेने त्यापद्धतीने भाषेचा पर्याय उपलब्ध करून द्यावा.

### हिंदी अनिवार्य नसल्याची घोषणा

राज्याच्या भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी या धोरणावर टीका केल्यानंतर सदर निर्णय मागे घेतला असल्याचेही दादा भुसे यांनी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांतील पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना मराठी आणि इंग्रजीसह हिंदी ही तृतीय भाषा म्हणून शिकावी लागणार होती.

# दहशतवादी हल्ल्यात डोंबिवलीतील 3 पर्यटकांचा मृत्यू!

## शहरावर शोककळा; जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद्यांचा पर्यटकांवर गोळीबार

। ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जम्मू काश्मीर येथील पहलगाम या ठिकाणी जो दहशतवादी हल्ला झाला, त्या हल्ल्यात महाराष्ट्रातले नागरिकही सापडले आहेत. डोंबिवली या ठिकाणी राहणाऱ्या तीन नागरिकांचा या दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झाला.तीन डोंबिवलीकरांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या दहशतावादी हल्ल्यात २० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. या पर्यटकांमध्ये तीन डोंबिवलीकरांचा समावेश होता अशी माहिती समोर आली आहे. अतुल मोने, हेमंत जोशी आणि संजय लेले अशा तीन जणांचा दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झाला आहे. .**




दरम्यान या हल्ल्यानंतर राजकीय वर्तुळातून प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी या हल्ल्याचा निषेध व्यक्त करत यासाठी जबाबदार असणाऱ्यांना कठोर शिक्षा दिली जाईल असे म्हटले आहे. जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याने मी व्यथित झालो आहे. मृतांच्या कुटुंबियांच्या दु:खात मी सहभागी आहे. या भ्याड दहशतवादी हल्ल्यात सहभागी असलेल्यांना माफ केले जाणार नाही आणि त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल आणि त्यांना गंभीर परिणाम भोगावे लागतील, असे अमित शाह म्हणाले आहेत.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे."जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा मी तीव्र निषेध करतो. हल्ल्यात ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावले आहे त्यांच्याप्रती मी संवेदना व्यक्त करतो. जखमी लवकरात लवकर बरे व्हावेत अशी मी प्रार्थना करतो. पीडितांना सर्वतोपरी मदत केली जात आहे. या घृणास्पद कृत्यामागे सहभागी आहेत त्यांना सोडणार नाही! त्यांचा दुष्ट अजेंडा कधीही यशस्वी होणार नाही. दहशतवादाविरुद्ध लढण्याचा आमचा निर्धार अढळ आहे आणि तो आणखी बळकट होईल" असे पंतप्रधान मोदी म्हणाले आहेततसेच व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संबंधित अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेतली असूनसर्व एजन्सींबरोबर तातडीची सुरक्षा आढावा बैठक घेण्यासाठी लवकरच श्रीनगरला रवाना होणार असल्याचेही अमित शाह यांनी सांगितले आहे.महत्त्वाची बाब म्हणजे बैसरन येथे फक्त पायी जाता येते, हे एक अत्यंत प्रसिद्ध पर्यटन स्थळ असून येथे पर्यटक मोठ्या संख्येने गर्दी करतात. घटनेनंतर लगेचच, पोलिसांचे एक पथक लष्कर आणि निमलष्करी दलांसह घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी पर्यटकांना येथून काढले आणि हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी शोध मोहीम सुरू केली. या वर्षी पर्यटकांवर झालेला हा पहिलाच दहशतवादी हल्ला आहे. गेल्या वर्षी मे महिन्यात अतिरेक्यांनी पर्यटकांवर शेवटचा हल्ला केला होता, ज्यामध्ये दोन पर्यटक जखमी झाले होते. ती घटना देखील पहलगाममध्ये घडली होती. जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाम येथे आज दुपारी दहशतवादी हल्ल्यात किमान २० लोकांचा मृत्यू झाल्याची बातमी समोर आली आहे. तर अनेक पर्यटक दहशतवादी हल्ल्यात जखमी झाले आहेत. दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास पहलगाम येथील बैसरन पर्वत रांगेच्या खोऱ्यात दहशतवाद्यांनी पर्यटकांना लक्ष्य केले. बैसरन पर्वत रांगेतील प्रसिद्ध असे मिनी स्वित्झर्लंड हे ठिकाण पर्यटकांचे प्रमुख आकर्षण केंद्र आहे. बेस कॅम्पवरून घोडा किंवा पायी ट्रेक करत अनेक पर्यटक येथे येत असतात. दहशतवाद्यांनी हल्ल्यानंतर अनेकांना त्यांचा धर्म विचारून गोळ्या झाडल्या, असा दावा प्रत्यक्षदर्शी पर्यटकांनी केला आहे. याबाबतचे अनेक व्हिडिओ आणि फोटो आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. रक्ताच्या थारोळ्यात पडलेले पर्यटक आणि त्यांना वाचविण्यासाठी त्यांचे नातेवाईक सैरावैरा पळताना दिसत आहेत.

### अब्दुल्ला यांनी हल्ल्याचा निषेध केला

एका महिलेचा व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे. ज्यात ती तिच्या नवऱ्याला धर्म विचारल्यानंतर गोळी झाडल्याचे सांगते. माझ्या नवऱ्याला वाचवा, असे आर्जव ती स्थानिक लोकांना सांगत आहे. तर स्थानिक लोक मदतीसाठी धावून आल्याचेही दिसत आहे.गोळीबार झाल्यानंतर अनेक जखमी पर्यटक अनेक ठिकाणी जखमी अवस्थेत पडल्याचे दिसून येत आहेत. कर्नाटक राज्यातील शिवमोगा येथील अनेक पर्यटकांचा या हल्ल्यात मृत्यू झाल्याचे सांगितलं जातं आहे. मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी या हल्ल्याचा निषेध व्यक्त केला आहे. हल्ला करणारे दहशतवादी हे रानटी आहेत. अलीकडच्या काळातील हा सर्वात मोठा दहशतवादी हल्ला आहे, असेही ते म्हणाले.

# गंभीर परिणाम भोगावे लागतील!

## भ्याड दहशतवादी हल्ल्यात सहभागी असलेल्यांना माफ केले जाणार नाही : शाह

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**दहशवादी हल्ल्याने काश्मीर हादरलं आहे. या हल्ल्यात सुमारे २० पर्यटकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येते आहे. जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाम येथील बैसरन पर्वतावर फिरायला गेलेल्या पर्यटकांच्या गटावर दहशतवाद्यांकडून बेछूट गोळीबार करण्यात आला. या घटनेत २० पर्यटकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान एक हृदय पिळवटून टाकणारा फोटो समोर आला आहे.**





दहशतवादी हल्ल्यासंदर्भात प्रत्यक्षदर्शींचे फोटो आणि व्हिडीओ समोर येत आहेत. दरम्यान एक हृदय पिळवटून टाकणारा फोटो समोर आला आहे. एक नवविवाहिता मधुचंद्रासाठी पहलगाम या ठिकाणी गेली होती. तिचा नवरा गोळीबारात ठार झाला आहे. त्याच्या मृतदेहाजवळ ती स्तब्ध बसून आहे. तिचा हा मूक आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा ठरला आहे. एका पर्यटकाने सांगितल्यानुसार दहशतवाद्यांनी पर्यटकांना नावं विचारुन ठार केलं. एक महिला रडत तिच्या नवऱ्याला वाचवण्यासाठी टाहो फोडत होती हे दृश्यही कॅमेरात कैद झालं आहे. जो माणूस व्हिडीओ रेकॉर्ड करत होता तो तिला शांत राहण्याचं आवाहन करत होता असाही एक व्हिडीओ समोर आला आहे. एक लहान मुलगा सांगतो ते लोक समोरुन आले आणि त्यांनी गोळीबार सुरु केला. माझ्या नवऱ्याला दहशतवाद्यांनी गोळ्या झाडून ठार केलं असं एका आक्रोश करणाऱ्या महिलेने सांगितलं.या हल्ल्यानंतर राजकीय वर्तुळातून प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी या हल्ल्याचा निषेध व्यक्त करत यासाठी जबाबदार असणाऱ्यांना कठोर शिक्षा दिली जाईल असे म्हटले आहे. जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याने मी व्यथित झालो आहे. मृतांच्या कुटुंबियांच्या दु:खात मी सहभागी आहे. या भ्याड दहशतवादी हल्ल्यात सहभागी असलेल्यांना माफ केले जाणार नाही आणि त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल आणि त्यांना गंभीर परिणाम भोगावे लागतील, असे अमित शाह म्हणाले आहेत.जम्मू आणि काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री आणि पीपल्स डेमोक्रॅटिक पक्षाच्या प्रमुख मेहबुबा मुफ्ती यांनी या हल्ल्याचा जाहीर निषेध व्यक्त केला. या घटनेत ज्यांना दुखापत झाली, त्या कुटुंबियांच्या मागे आम्ही ठामपणे उभे आहोत. या हल्ल्यामागे फक्त येथील शांतता भंग करून विनाकारण दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न दिसतो.


### मेहबुबा मुफ्तींनी काय म्हटलं आहे?

एका पर्यटकाने सांगितल्यानुसार दहशतवाद्यांनी पर्यटकांना नावं विचारुन ठार केलं. एक महिला रडत तिच्या नवऱ्याला वाचवण्यासाठी टाहो फोडत होती हे दृश्यही कॅमेरात कैद झालं आहे. जो माणूस व्हिडीओ रेकॉर्ड करत होता तो तिला शांत राहण्याचं आवाहन करत होता असाही व्हिडीओ समोर आला आहे.

# मी धूम २ मध्ये किसिंग सीन शूट केला होता

अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चन नुकतीच तिच्या सोशल मीडियावरील पोस्टमुळे चर्चेत आली होती. तिने अभिषेक बच्चन व तिच्या लग्नाच्या १८ व्या वाढदिवसानिमित्त सोशल मीडियावर एक फोटो शेअर केला होता.ऐश्वर्याने शेअर केलेल्या फोटोमध्ये अभिषेक, ऐश्वर्या व त्यांची मुलगी आराध्या यांनी पांढऱ्या रंगाचे कपडे परिधान केल्याचे पाहायला मिळाले. या कुटुंबाला एकत्र पाहून चाहत्यांनी आनंद व्यक्त केला. अभिनेत्री अनेक गाजलेल्या चित्रपटांसाठी ओळखली जाते.देवदास, हम दिल दे चुके सनम अशा अनेक चित्रपटांतील तिच्या भूमिकांनी प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले. अभिनेत्रीला मोठी लोकप्रियता मिळाली. ऐश्वर्या राय बच्चनने २०१२ मध्ये डेली मेलला मुलाखत दिली होती. या मुलाखतीत तिने असे म्हटले होते की तिने अनेक चित्रपटांच्या ऑफर्स नाकारल्या. याचे कारण म्हणजे त्या चित्रपटातील किसिंग सीन करण्यास तिला अवघडल्यासारखे व्हायचे. याबरोबरच, तिने या मुलाखतीत असाही खुलासा केला होता की धूम २ चित्रपटातील किसिंग सीनसाठी तिला कायदेशीर नोटीस आल्या होत्या. ऐश्वर्या राय म्हणाली होती, “मी काही पाश्चात्य सिनेमांतील भूमिकाही नाकारल्या. त्याआधी ऑनस्क्रीन किसिंग सीनचे शूट केले नव्हते. मी धूम २ मध्ये किसिंग सीन शूट केला होता. त्यासाठी मला काही लोकांकडून कायदेशीर नोटीस आल्या होत्या. त्यांचे म्हणणे असे होते की तू आमच्या मुलींसाठी आदर्श आहेस. तू इतक्या चांगल्या पद्धतीने तुझं आयुष्य जगत आहे. पडद्यावर तुला असं बघणं, त्यांना आवडत नाही. तरीसुद्धा तू हे का केलंस? मला असे वाटले की मी एक कलाकार आहे आणि मी माझे काम केले आहे. दोन-तीस तासाच्या चित्रपटातील दोन-तीन सेकंदासाठी माझ्याकडून स्पष्टीकरण मागितलं जात आहे.” पुढे ऐश्वर्या राय असे म्हणाली होती की अनेक कलाकार असे सीन करतात. पण भारतीय संस्कृतीत सार्वजनिकरित्या असे प्रेमाचे प्रदर्शन करणे, हे सामान्य नाही. आपल्या सिनेमात कलाकारांना ऑनस्क्रीन किसिंग सीन करताना अवघडल्यासारखे वाटते.

## आमिर खान बनवणार महाभारतावर आधारित चित्रपट



‘द परफेक्शनिस्ट’ अशी ओळख असणारा बॉलीवूड अभिनेता आमिर खान नेहमी वैविध्यपूर्ण कलाकृती प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन येत असतो. ‘दंगल’, ‘लगान’, ‘पीके’, ‘तारे जमीन पर’ यांसारख्या अनेक उत्तमोत्तम कलाकृतींमध्ये आमिर खानने काम करीत प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. आमिर खान शेवटचा ‘लालसिंग चड्ढा’ या चित्रपटात पाहायला मिळाला होता. हा ‘फॉरेस्ट गंप’ या हॉलीवूड चित्रपटाचा रिमेक होता. त्यानंतर अद्याप आमिर खान दुसऱ्या कोणत्याही चित्रपटात पाहायला मिळाला नाही. अशातच आता आमिर खान लवकरच एक भव्य कलाकृती घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आमिर खान महाभारतावर आधारित एक नवीन चित्रपट बनवणार असल्याचं त्यानं म्हटलं आहे. ‘द हॉलीवूड रिपोर्टर इंडिया’शी संवाद साधताना त्यानं याबाबत वक्तव्य केलं आहे. आमिरने म्हटले आहे, “लवकरच ‘महाभारत’ या चित्रपटाचं काम सुरू करणार आहे. चित्रपटाची निर्मिती मी स्वत: करणार असून, या वर्षी चित्रपटाचं काम सुरू होईल. पण सुरुवातीचा बराच काळ चित्रपटाच्या लिखाणासाठी जाईल”.याबाबत बोलताना त्याने सांगितले की, या चित्रपटाचे ‘लॉर्ड ऑफ द रिंग्ज’ या हॉलीवूड सीरिजप्रमाणे अनेक भाग बनविण्यात येतील. या चित्रपटाचं लिखाण पूर्ण होण्यासाठी बराच मोठा काळ जाईल”. पुढे तो म्हणाला, “या चित्रपटात मी असेन की नाही हे अद्याप सांगू शकत नाही. त्याची संपूर्ण जबाबदारी कास्टिंग टीमची आहे. त्यामुळे आम्ही कलाकारांची निवड करताना कोण कोणत्या भूमिकेसाठी योग्य आहे हे पाहूनच त्यांची निवड करू”.मला वाटत नाही की, महाभारत एका भागातून सांगितलं जाऊ शकतं. म्हणून आम्ही या चित्रपटाचे अनेक भाग करण्याचा विचार करीत आहोत.

## सोनू निगमच्या नावाचा होतोय गैरवापर

बॉलीवूडच्या काही लोकप्रिय गायकांपैकी एक म्हणजे सोनू निगम. सोनू निगमने आजवर आपल्या सुमधुर आवाजाने हिंदीसह मराठी रसिकांची मनं जिंकली आहेत. जगभरात त्याच्या आवाजाचे लाखों चाहते आहेत. आपल्या गाण्यांनी व आवाजाने चर्चेत राहणारा सोनू निगम सोशल मीडियावरही तितकाच सक्रीय असतो. सोशल मीडियावर तो त्याचे अनेक फोटो व गाण्याचे व्हिडीओ शेअर करत असतो. अशातच सोनू निगमने नुकतीच शेअर केलेली एक पोस्ट सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.गायकाच्या नावाने सोशल मीडियावर काही अकाउंट्स सुरू करण्यात आले असून त्याच्या प्रसिद्धी आणि लोकप्रियतेचा गैरवापर केला जात आहे. याचबद्दल सोनू निगमने स्वतःच्या इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत चाहत्यांना सतर्क राहण्याचे आवाहन केलं आहे.

## वैष्णवीनं केले गंभीर आरोप



अभिनेत्री वैष्णवी धनराज ही सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. वैष्णवी धनराजनं अनेक हिट टीव्ही मालिकांमध्ये काम केलं आहे. सीआयडी आणि तेरे इश्क में घायाल यांसारख्या मालिकांमध्ये तिनं महत्वाची भूमिका साकारली आहे. वैष्णवीनं नुकताच एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओच्या माध्यमातून वैष्णवीनं तिच्या कुटुंबावर काही गंभीर आरोप केले आहेत. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये वैष्णवीने तिच्या चाहत्यांना सांगताना दिसत आहे की, 'हाय, मी वैष्णवी धनराज आहे. मला आत्ता खरोखर मदतीची गरज आहे. मी काशिमीरा पोलीस ठाण्यात आहे, माझ्या कुटुंबियांनी मला शिवीगाळ आणि मारहाण केली. मला मीडिया, न्यूज चॅनेलमधील सर्वांची मदत हवी आहे. कृपया या आणि मला मदत करा'.वैष्णवीच्या या व्हिडीओमध्ये तिच्या चेहऱ्यावर आणि शरीरावर जखमांच्या खुणा दिसत आहेत. त्याच्या ओठावर जखम होती आणि उजव्या हाताच्या मनगटावर जखम दिसत आहे. आजतकला दिलेल्या मुलाखतीमध्ये वैष्णवीनं सांगितलं की, "माझा भाऊ, वहिनी आणि माझी आई गेल्या दहा वर्षांपासून मला त्रास देत आहेत. त्यांनी मला मारहाण करण्याची ही पहिलीच वेळ नाही, असे सातत्याने घडत आले आहे. त्यांना माझे आयुष्य नियंत्रित करायचे आहे, मी कुठे जात आहे, मी कोणाशी बोलत आहे, ते त्यांना जाणून घ्यायचे आहे. मला टॉर्चर करण्याचे कारण मेरी रोड येथील प्रॉपर्टी आहे. ती त्यांना माझ्याकडून हिसकावून घ्यायची आहे.

# अनुराग कश्यपने ब्राह्मण समाजाची माफी मागितली

दिग्दर्शक अनुराग कश्यपने ‘फुले’ चित्रपटावरून सुरू असलेल्या वादाबद्दल बोलताना ब्राह्मणांबद्दल वादग्रस्त विधान केले होते. याप्रकरणी आता त्याने जाहीर माफी मागितली आहे. अनुरागने त्याच्या सोशल मीडिया अकाउंटवर एक पोस्ट शेअर करून बोलताना मर्यादा ओलांडल्याची कबुली दिली आहे. “रागाच्या भरात कोणाला तरी उत्तर देताना मी माझी मर्यादा विसरलो. आणि संपूर्ण ब्राह्मण समाजाला वाईट म्हटलं. या समाजातील अनेक लोक माझ्या आयुष्यात होते, अजूनही आहेत आणि त्यांचं माझ्या आयुष्यात खूप मोठं योगदान आहे. आज ते सर्वजण माझ्यामुळे दुखावले गेले आहेत. माझ्यामुळे माझ्या कुटुंबालाही दुःख झालं आहे. मी ज्यांचा आदर करतो असे सर्व बुद्धिजीवी लोक, रागात मी ज्या पद्धतीने बोललो त्यामुळे दुखावले आहेत.अशा पद्धतीने बोलून मी माझ्याच मूळ विषयाला भरकटवलं. या समाजाची मी मनापासून माफी मागतो, ज्यांना



मला हे अजिबात बोलायचं नव्हतं, पण कुणाच्या तरी वाईट कमेंटला उत्तर देताना मी रागात हे लिहिलं. मी माझ्या सर्व मित्रांची, माझ्या कुटुंबाची आणि समाजाची माझ्या बोलण्याच्या पद्धतीबद्दल आणि अपमानास्पद भाषा वापरण्याबद्दल माफी मागतो. पुन्हा असं होऊ नये, यासाठी मी काम करेन. मी माझ्या रागावर काम करेन. आणि जर मला एखाद्या विषयावर बोलायचं असेल तर मी योग्य शब्दांचा वापर करेन. तुम्ही मला माफ कराल, अशी मला आशा आहे,” असं अनुराग कश्यपने त्याच्या पोस्टमध्ये लिहिलं आहे. त्याने आत्मनिरीक्षण असं कॅप्शन देऊन ही पोस्ट शेअर केली आहे.‘फुले’ चित्रपटाचे समर्थन करताना अनुरागने ब्राह्मण समाजाबद्दल वादग्रस्त विधान केलं होतं. चित्रपटाला विरोध करणाऱ्यांवर अनुरागने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नाव घेऊन टीका केली होती. या पोस्ट खालील एका कमेंटला उत्तर देत असताना अनुराग कश्यपने ब्राह्मण समाजाबद्दल वादग्रस्त विधान केलं होतं. अनुरागच्या या विधानानंतर त्याला धमक्या येत होत्या. नंतर त्याने दुसरी पोस्ट केली होती. “मी माफी मागतो पण माझ्या पोस्टसाठी नाही, तर जी एक ओळ लिहिली होती. ज्याला चुकीच्या पद्धतीने घेतले जात असून त्यावरून द्वेष पसरवला जात आहे.

# दिल्लीचा लखनऊवर दणदणीत विजय!

## लखनऊचे संघमालक राहुलला भेटायला आले

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**केएल राहुल आपल्या जुन्या संघाविरुद्ध पहिल्यांदाच खेळण्यासाठी मैदानात उतरला. त्यामुळे तो कशी कामगिरी करणार याकडे सर्वांचं लक्ष लागून होतं. आपल्या जुन्या होम ग्राउंडवर खेळताना केएल राहुलची बॅट चांगलीच तळपली. धावांचा पाठलाग करताना तो शेवटपर्यंत उभा राहिला आणि षटकार मारून दिल्लीला विजय मिळवून दिला. दरम्यान या सामन्यानंतर संजीव गोयंका यांनी केएल राहुलचं अभिनंदन केलं, ज्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतोय.**



केएल राहुल गेल्या हंगामात लखनऊ सुपर जायंट्स संघाचा कर्णधार होता. मात्र संघाच्या फ्लॉप कामगिरीनंतर संजीव गोयंका केएल राहुलवर संताप व्यक्त करताना दिसून आले होते. त्यामुळे केएल राहुलने या संघाची साथ सोडण्याचा निर्णय घेतला. मेगा ऑक्शनमध्ये त्याला दिल्ली कॅपिटल्सने आपल्या संघात स्थान दिलं. या हंगामात तो दिल्ली कॅपिटल्स संघासाठी एक्स फॅक्टर ठरतोय.यापूर्वी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात केएल राहुलने ९३ धावांची शानदार खेळी करून संघाला विजय मिळवून दिला होता. आता लखनऊ सुपर जायंट्स संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात त्याने शानदार अर्धशतकी खेळी केली आणि षटकार मारून संघाला ८ गडी राखून विजय मिळवून दिला. या सामन्यानंतर एक व्हिडिओ तुफान व्हायरल होत आहे, ज्यात संजीव गोयंका मैदानात येऊन केएल राहुलचं अभिनंदन करताना दिसून येत आहे. मात्र केएल राहुल थांबलाच नाही. राहुल हात मिळवून पुढे निघून गेला.या सामन्यात केएल राहुलने आणखी एक मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. केएल राहुल हा आयपीएल स्पर्धेच्या इतिहासात सर्वात जलद ५००० धावा पूर्ण करणारा फलंदाज ठरला आहे. हा कारनामा त्याने १३० व्या डावात केला आहे. यापूर्वी डेव्हिड वॉर्नरने हा कारनामा १३५ व्या डावात केला होता. तर विराट कोहलीने १५७ आणि एबी डिव्हिलियर्सने हा कारनामा १६१ व्या डावात केला होता.केएल राहुल पुन्हा एकदा दिल्ली कॅपिटल्सच्या विजयाचा हिरो ठरला आहे. आपल्या जुन्या संघाविरूद्ध खेळताना केएल राहुलची बॅट चांगलीच तळपली. दिल्लीचा संघ या सामन्यात १६० धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरला होता. या धावांचा पाठलाग करताना अभिषेक पॉवेलचं दमदार अर्धशतक, केएल राहुल आणि अक्षर पटेलच्या शानदार फलंदाजीच्या बळावर दिल्लीने ८ गडी राखून विजय मिळवला. यासह गुणतालिकेत अव्वल स्थानी झेप घेतली आहे.दिल्ली कॅपिटल्सला हा सामना जिंकण्यासाठी १६० धावा करायच्या होत्या. खेळपट्टी फलंदाजीसाठी चांगली होती. चेंडू बॅटवर चांगल्याप्रकारे येत होता. हे पाहता १६० धावा करणं फार कठीण काम नव्हतं. या धावांचा पाठलाग करण्यासाठी अभिषेक पॅरेल आणि करूण नायरची जोडी मैदानावर आली. या दोघांनी पहिल्या विकेटसाठी ३६ धावा जोडल्या. करुण नायरने काही आकर्षक फटके मारले, पण तो १६ धावा करत माघारी परतला. अभिषेकने आपली फटकेबाजी सुरूच ठेवली. त्याने ३६ चेंडूंचा सामना करत ५१ धावांची खेळी केली. शेवटी केएल राहुल शो पाहायला मिळाला. त्याने अक्षर पटेलसोबत मिळून दिल्लीचा विजय निश्चित केलं.या सामन्यात दिल्लीचा कर्णधार अक्षर पटेलने नाणेफेक जिंकून लखनऊ सुपर जायंट्सला प्रथम फलंदाजीचं आमंत्रण दिलं. लखनऊकडून डावाची सुरुवात करण्यासाठी मिचेल मार्श आणि एडन मार्करमची जोडी मैदानावर आली.

### दिल्लीचा शानदार विजय

या दोघांनी संघाला वादळी सुरूवात करून दिली. ज्याप्रकारे हे दोन्ही फलंदाज फलंदाजी करत होते, ते पाहता असं वाटलं होतं की लखनऊचा संघ मोठी धावसंख्या उभारणार. सलामीला फलंदाजी करताना एडन मार्करमने ३३ चेंडूंचा सामना करत ५२ धावांची खेळी केली. तर मिचेल मार्श ३६ चेंडूंवर ४५ धावांची खेळी करून माघारी परतला.सलामी जोडीने संघाला चांगली सुरूवात करुन दिली. पण त्यानंतर आलेल्या फलंदाजांना या चांगल्या सुरूवातीचा फायदा करून घेता आला नाही. फॉर्मात असलेला निकोलस पूरने अवघ्या ९ धावांवर तंबूत परतला. तर अब्दुल समद २ धावांवर माघारी परतला. या डावात रिषभ पंतने चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला यायला हवं होतं. मात्र तो शेवटचे २ चेंडू शिल्लक असताना सातव्या क्रमांकावर फलंदाजीला आला आणि शून्यावर बाद होऊन माघारी परतला.२१ चेंडूंचा सामना करत ३६ धावांची खेळी केली.

---

# मला बॅटिंगला का नाही पाठवलं?

## ऋषभ पंत शेवटचे दोन चेंडू शिल्लक असताना फलंदाजीला आला

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**दिल्ली कॅपिटल्स संघाचा संपूर्ण डाव संपला, पण ऋषभ पंत शेवटचे दोन चेंडू शिल्लक असताना फलंदाजीला आला. लखनऊच्या एकाना स्टेडियमवर दिल्ली कॅपिटल्स आणि लखनऊ सुपर जायंट्स या दोन्ही संघांमध्ये रोमांचक सामना सुरू आहे. या सामन्यात लखनऊचा संघ नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजीसाठी आला. मात्र शेवटच्या काही षटकांमध्ये कर्णधार ऋषभ पंत चर्चेत राहिला.**



यामागचं कारण म्हणजे, या डावात त्याला केवळ शेवटचे २ चेंडू खेळण्याची संधी मिळाली. एकाना स्टेडियमवर सुरू असलेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार अक्षर पटेलने नाणेफेक जिंकून लखनऊ सुपर जायंट्सला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं. लखनऊ सुपर जायंट्सकडून एडन मार्करम आणि मिचेल मार्शने डावाची सुरूवात केली. दोघांनीही संघाला विस्फोटक सुरूवात करुन दिली. डावाच्या सुरूवातीला एडन मार्करमने ३३ चेंडूंचा सामना करत ५२ धावांची खेळी केली.या खेळीदरम्यान त्याने २ चौकार आणि ३ षटकार मारले. त्याला साथ देत मिचेल मार्शने ३६ चेंडूंचा सामना करत ४५ धावांची खेळी केली. ही जोडी १० षटकं मैदानावर टिकून होती. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर निकोलस पूरन फलंदाजीला आला. पूरनने लागोपाठ २ चौकार मारले, पण त्यानंतर तो बाद होऊन माघारी परतला.झटपट ३ विकेट्स गेल्यानंतर चौथ्या क्रमांकावर ऋषभ पंत फलंदाजीला येणार हे निश्चित होतं. मात्र असं काहीच झालं नाही. चौथ्या क्रमांकावर अब्दुल समद फलंदाजीला आला. समदला अवघ्या २ धावा करता आल्या. त्यानंतर पाचव्या क्रमांकावर डेव्हिड मिलर फलंदाजीसाठी आला. मिलर शेवटपर्यंत नाबाद राहिला. पण त्याला मोठी खेळी करता आली नाही. त्याने १५ चेंडूंचा सामना करत १४ धावांची खेळी केली.लखनऊकडून आयुष बदोनी सहाव्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आला. ज्यावेळी आयुष बदोनी आणि डेव्हिड मिलर फलंदाजी करत होते, त्यावेळी ऋषभ पंत डगआऊटमध्ये पॅडअप करून होता. मात्र त्याला जहीर खानने फलंदाजीसाठी पाठवलंच नाही. ऋषभ जहीर खानच्या बाजूला बसून चर्चा करताना दिसून आला. त्याचे हावभाव पाहून वाटत होतं की, तो फलंदाजीला न पाठवल्यामुळे नाराज आहे. तो,मला बॅटिंगला का नाही पाठवलं?

### ऋषभ क्लिन बोल्ड झाला

असं म्हणतानाही दिसून आला. शेवटच्या षटकातील चौथ्या चेंडूवर आयुष बदोनी आऊट झाला आणि ऋषभला फलंदाजीला येण्याची संधी मिळाली. शेवटच्या षटकातील पाचवा चेंडू निर्धाव राहिला. तर शेवटच्या चेंडूवर ऋषभ क्लिन बोल्ड झाला.शेवटच्या काही षटकांमध्ये कर्णधार ऋषभ पंत चर्चेत राहिला.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। बुधवार ।
। दि. 23 एप्रिल 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती






From 21st April 2025

1 Hour /day

Monday to Saturday

# Moaraya Shikshan Sanstha Computer Vacation Batch

"यत् भावो – तत् भवति"

## Our Courses



- Corel Draw
- Adobe Photoshop
- Scratch Animation
- 'C' Language
- 'C ++' Language
- Basic Java
- Basic Tally
- M. S. Office

Contact: 8087706100/ Computer Lab

Registration started

Venue: Computer Lab, V. K. Mate Highschool

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

2025-26
ADMISSIONS
OPEN

PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI



42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

50 FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS

Contact Us Now
86687 55826
98232 31705

Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241

KAMALA Education Society

KAMALA EDUCATION SOCIETY'S

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)



# BBA

**Bachelor of Business Administration**



# BCA

**Bachelor of Computer Applications**

### Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more


MASTER MIND GLOBAL SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is Creativity, There is Master Mind
7 STAR RANKING
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
A++ Grade In Leadership & Quality Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com